# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 15/06/2021 (मंगळवार)
(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावरील टोल नोका पाटणसावंगी येथे दिनांक 14/06/2021 चे 05:00 वा. दरम्यान अज्ञात वहान चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून रोड ओलांडून पलीकडे जाणाऱ्या अनोळखी मनोरूग्ण इसम वय 40 वर्ष यास धडक मारून पळून गेला. सदर मनोरूग्ण इसम हा अपघाता मध्ये गंभीर जखमी होवून मरण पावला.

सदर प्रकरणी नामे– ज्ञानेश्वर विनायकराव ठाकरे, वय 33 वर्ष, रा. आदर्श नगर, पाटणसावंगी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री निशांत फुलेकर मो न. 7588564300 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील मौजा कोदेगाव ते सावनेर हायवे रोडे येथे दिनांक 14/06/2021 चे 07:00 वा. दरम्यान एमएच– 31/ बीई– 8410 क्रमांकाचा ट्रॅक्टर मुंडाचा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर रोडचे क्रॉसींग वर भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवीत नेउन खापा कडुन सावनेर मार्गे जाणाऱ्या एमएच– 40/बीआर–3057 क्रमांकाच्या हिरो डिलक्स मोटारसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक/मृतक नामे– किसना चंद्रभान दुधकवडे, वय 45 वर्ष, रा. पानउबडी व मोटरसायकल चालकाचा साळा/मृतक नामे– प्रकाश रामचंद्र बोरीवार वय 22 वर्ष रा. कान्हादेवी हे दोघेही मरण पावले व सौ. शशीकला किसना दुधकवडे, वय 40 वर्ष, रा. पानउबडी या गंभीर जखमी झाल्या.

सदर प्रकरणी नामे– मोहन बाबुलाल ठाकुर, वय 50 वर्ष, रा. कोदेगाव यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोनि श्री अजय मानकर 9422942764 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर